# REVIEW OF RESEARCH

UGC APPROVED

nternational Online Multidisciplinary Journal


SSN 2249-894X

mpact Factor: 5.7631 (UIF)

GC Journal Number: 48514

GC List Number: 1232


# Maharashtra : History, Culture & Society




Editor
Dr. Devidas Waydande

Editor-in-Chief
Dr. Ashok Yakkaldevi


Scanned with CamScanner


| | | |
|---|---|---|
| | श्री गुरुगुंजा प्रासादिक वीरनाथ सांप्रदायिक चक्रीभजन परंपरा<br>अपर्णा मल्लिनाथ गुरव | 77 |
| | डॉ. काशीबाई नवरंगे-व्यक्ती आणि कार्य<br>प्रा. डॉ. अरुणा मोरे | 79 |
| | कागदनिर्मिती,छपाईतंत्र व ग्रंथाविषयीसंदर्भात ज्ञानोदय वृत्तपत्राने घेतलेली भूमिका : ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा. बाळासाहेब काळे | 83 |
| | महाराष्ट्राची कुस्ती परंपरा : एक अभ्यास<br>प्रा. बाळासाहेब मरगजे | 86 |
| | ग्रामीण साहित्य व संस्कृती<br>डॉ. भाऊसाहेब दा. गव्हाणे | 90 |
| | आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत उपेक्षित असलेल्या [illegible]ारदा कबीर यांचे योगदान<br>प्रा. डॉ. भावना श्रीपती पौळ | 95 |
| | गोंड आदिवासींच्या विकासातील 'सर्च' चे योगदान<br>प्रा.के.जे.चव्हाण | 100 |
| | राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील स्नेह<br>प्रा.डॉ.चौधरी डी.एम. | 105 |
| | भोर संस्थानातील जकात व करव्यवस्था<br>प्रा.डॉ.आर.व्ही.हेरे | 109 |
| | Pilgrimage Tourism Of Jejuri Town: A Study With Respect To Historical Perspective<br>Dr. Ghadge Shrikant Tukaram | 114 |
| [illegible] | A Study Of Historical Remains Of Kasegaon Pargana<br>Dr. Salunkhe Umesh Ashok | 120 |
| [illegible] | महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील विवाह पद्धती : — एक ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा. डॉ. दत्तात्रय रामचंद्र हुबल | 124 |
| [illegible] | [illegible]ुक्त महाराष्ट्राचा लढा - एक अभ्यास<br>प्रा. गायकवाड प्रेमचंद गुंड् | 129 |
| 1 | प्राचीन खानदेशातील सातवाहन कालीन नाणी व मुद्रा - एक ऐतिहासिक अभ्यास<br>डॉ. एच. आर. चौधरी, प्रा. एच. बी. सरतापे | 135 |
| 2 | वारकरी संत परंपरेतील संत श्री.निळोबाराय पिंपळनेरकर यांचे वाङ्मयीन कार्य<br>प्रा.हरिदास शंकर जाधव | 137 |
| 13 | आदिवासी समाजाच्या विकासात शाश्वत संस्था, मंचरचे योगदान<br>डॉ.जाधव संतोष हनुमंत | 140 |
| 14 | परगणे सुपे येथील गोतसभेचा मजहरनामा - इ.स.१६५७ आणि त्याबाबत शिवाजीराजांची भूमिका : एक अभ्यास<br>सहा.प्रा. दत्तात्रय ग. जगताप | 147 |
| 35 | जगप्रसिद्ध अजंठा — वेरुळ लेणी : एक ऐतिहासिक आढावा<br>प्रा. जवाहर चौधरी | 152 |
| 36 | महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासामध्ये बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांचे योगदान<br>डॉ. करीम नबी मुल्ला | 156 |


Scanned with CamScanner

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)

# राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील स्नेह

प्रा.डॉ.चौधरी डी.एम.
इतिहास विभाग , दादा पाटील महाविद्यालय,कर्जत
ता.कर्जत, जि.अहमदनगर.



...क:—

...र्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भेट ...नंतर घडून आलेला परस्परांतील सहयोग ही आधुनिक इतिहासातील एक अपुर्व घटना होती. भारतातील ,अस्पृश्यता निष्ट करण्यासाठी चांगल्या नेतृत्वाची तसेच हिंदूस्थानातील कोटयावधी दलीत बांधवांची ...विणाऱ्या नेत्याची हिंदूस्थानला गरज होती ती डॉ. ...रूपाने लाभल्याचे उद्गार राजर्षी शाहू महाराजांनी ... राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर ... भेट घडून आली तेव्हा पासून ते शेवट पर्यत यांच्यात जिव्हाळयाचे संबंध होते. राजर्षी शाहू ...डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वेळोवेळी शिक्षणासाठी व दलित चळवळीसाठी आर्थिक सहकार्य

## ...राव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्ती:—

...जा सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीच्या आधारावर बाबासाहेब अमेरिकेला ... कोलंबिया विद्यापीठात त्यांनी एम्.ए. आणि पीएच्.डी. या पदव्या प्राप्त केल्यानंतर लंडन ...एम्.एस्सी. व बार—ॲट—लॉ या पदव्या मिळवण्यासाठी इंग्लडला प्रयाण झाले होते.पण ...ने त्यांची शिष्यवृत्तीची मुदत वाढून द्यावयास नकार दिल्यामुळे त्यांना नाइलाजाने मायदेशी ...ले. त्यानंतर लगेचच शिष्यवृत्तीच्या अटी नुसार त्यांना बडोद्या संस्थानात नोकरीस जावे ...स्पृश्य म्हणून त्यांना बडोद्यांत राहावयास जागा मिळणे मुश्किल झाले. ऑफिस मध्ये ... त्यांची सतत अवहेलना सुरू झाली.मानखडना व मन:स्ताप यांच्या कात्रीत सापडलेल्या ...टका सयाजीराव महाराजही करू शकले नाही. परिणामी अगतिक होवून त्यांनी बडोद्याची ...मुंबईस परतले.[1]

## ... व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भेट:—

... इ.स. १९१८ मध्ये बाबासाहेबांचे नाव शाहू महाराजांच्या कानावर गेले असावे. ...म्हण परदेशातील इतक्या उच्च पदव्या प्राप्त करून आल्याचे महाराजांना समजताच ... झाला आणि त्यांस भेटण्याची उत्सुकता त्यांच्या ठिकाणी निर्माण झाली.

…चे चरित्रकार चांगदेव खैरमोडे यांनी म्हटले आहे की कोल्हापूरातील अस्पृश्य समाज… … कार्यकर्ते दत्तोबा पोवार यांचा बाबासाहेबांशी परिचय होता व त्यांनीच महाराजा… …साहेबांविषयी प्रथम माहिती सांगितली. पण धनंजय कीरांनी लिहिले आहे कि याच दत्तोबा पोवारांनी …महाराज आणि बाबासाहेब यांची भेट घडवून आणली. खैरमोडे यांनी या भेटीचे साल १९२० दिले आहे. …यद्यपी हि भेट दत्तोबा पोवार यांच्या ऐवजी दत्तोबा दळवी यांनी घडवून आणल्याचे भाई माधवराव बागल यांनी आपल्या आठवणीत सांगितले. भाई माधवराव बागल यांना ही हकिकत खुद्द दळवी यांनीच सांगितली. दळवी हे उत्तम आर्टिस्ट असून ते महाराजांच्या प्रेमातील गृहस्थ होते. त्यांनाच महाराजांनी प्रथम बाबासाहेबाकडे पाठवून दिले होते. पुढे बाबासाहेब व शाहू महाराज यांची भेट घडून आली. असे बागलांनी कथन केलेल्या आठवणी वरून स्पष्ट होते. तसेच ही भेट खैरमोडे सांगतात त्या प्रमाणे सन १९२० मध्ये न होता. ती सन १९१९ मध्ये घडून आली असावी कारण जानेवारी १९२०मध्ये बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले होते या पाक्षिकाला शाहू महाराजांनी अर्थसाहय केले होते. या वरून तत्पूर्वी उभयांची भेट घडून आली असावी असे दिसते.[2]

**मुकनायक व मानगाव परिषद :–**

जानेवारी १९२०मध्ये बाबासाहेबांनी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले या पाक्षिकाला शाहू महाराजांनी अर्थसाहय केले होते.शतकानुशतके मुका बनून राहिलेल्या बहिष्कृत समाजात जागृती करून त्याचे नेतृत्व करू इच्छिणाऱ्या आपल्या वृत्तपत्रास बाबासाहेबानी 'मूकनायक' हे मोठे अन्वयार्थक नाव दिले. 'मूकनायक'चे संपादक म्हणून बाबासाहेबांच्या सहकार्यांची नावे येत असली तरी त्यामागील प्रेरणा बाबासाहेबांची होती. एवढे नव्हे तर त्यातील प्रारंभीचे आग्रलेख त्यांच्याच लेखनीतून उतरलेले होते. बाबासाहेब व शाहू महाराज यांचे घनिष्ठ संबंध आला तो मार्च १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानात माणगाव येथे भरलेल्या परिषदेत. आपला आनंद व्यक्त करताना शाहू महाराज म्हणाले " तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला, हया बद्दल मी तुमचे अंत:करणपुर्ण अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे तुमचा उध्दार केल्या शिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की,ते सर्व हिंदूस्थानाचे पुढारी होतील. अशी माझी मनोदेवता मला असे सांगते आहे "

याच परिषदेत महाराजांनी बाबासाहेबांना आपल्याकडील भोजणाचे जाहीर निमंत्रण दिले होते. त्याप्रमाणे सोनतळी कॅम्पवर सहभोजनाचा जंगी कार्यक्रम घडवून आणला होता. कोल्हापूरच्या भेटीत महाराजांनी बाबासाहेबांना मोठया सन्मानाने वागविले होते व शेवटी निरोप देते वेळी कोल्हापूरी 'जरी पटक्या'चा प्रेमाचा आहेर ही केला होता. हा आहेर स्विकारतांना बाबासाहेब गहिवरून गेले आणि ते म्हणाले "छत्रपतींनी मानाचा जरी पटका माझ्या मस्तकी चढविला ,त्यांचा मी सदैव मान राखीन !"

मनगाव परिषदे नंतर अवघ्या सव्वादोन महिन्यानी नागपूरात 'अखिल भारतीय बहिष्कृत समाजाच्या परिषदे'च्या निमित्ताने शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पुन्हा एखदा भेट घडून आली आणि या भेटीत उभयांतातील संबंध अधिकच दृढ झाले. या परिषदेत येवू घातलेल्या राजकिय सुधारणा आणि त्यानुसार अस्पृश्यांना कायदेमंडळात मिळणारे प्रतिनिधित्व हा मोठा ज्वलंत प्रश्न चर्चिला गेला. अस्पृश्य समाजाची भूमिका सरकारला स्पष्ट करण्यासाठी बाबासाहेबांनीच शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली या परिषदेचे अयोजन केले होते. अशा प्रकारे पुढील काळात राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध अधिक दृढ झाले. अस्पृश्यमुक्ती चळवळीसाठी एखादा निधी गोळाकरण्याचा उपक्रम हाती घ्यावा व त्यासाठी जी समिती स्थापन करायची त्यात शाहू महाराजांचे नाव असावे अशा आशयाचे पत्र बाबासाहेबांनी पाठविले होते. त्यापत्राला उत्तर देताने महाराज म्हणतात " आपण जे डेप्युटेशन फंड गोळाकरण्या करीता पाठविणार आहे, त्या माझे नाव घालण्यात मी मोठया संतोषाने परवानगी देतो. आपण जी काही संस्था सदरहू कामा करिता स्थापन कराल तिचा व्हाइस प्रेसिडेंट, असिस्टंट सेक्रेटरी होण्यास मी तयार आहे. मला वाटते आपण एक 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस एज्युकेशन फंड ' संस्था स्थापन करून तिच्या करीता चांगली वजनदार व काम करणारी माणसे कामगार म्हणून निवडावीत आणि या संस्थेच्या वतीने ठिकठिकाणी डेप्युटेशन पाठवित जावीत; म्हणजे फंड



Scanned with CamScanner

...रणे सोयीचे होईल.मला स्वत:ला असिस्टंट सेक्रेटरी होण्याची फार इच्छा आहे व मी हे काम मोठया ...दाने करीन "[3]

## ...जून शाहू महाराजांचा वाढदिवस :—

२६जून शाहू महाराजांचा वाढदिवस, हा वाढदिवस अस्पृश्य समाजाने सणा प्रमाणे साजरा करावा. ...ा ठराव बाबासाहेबांच्या प्रेरणेने माणगाव परिषदेने केला होता. नागपूर परिषदेतही तसाच ठराव केला .[४]

## ...शिक्षणाच्या खर्चासाठी शाहू महाराजांचे आर्थिक सहाय्य :—

बाबासाहेब सिडनहॅम कॉलेज मध्ये चरितार्थचे साधन म्हणून प्राध्यापकाची नोकरी करत होते. पण ...चे लक्ष अपुऱ्या राहिलेल्या विद्याभ्यासाकडे लागून राहिले होते. तो पुरा करण्यासाठी ठराविक मुदतीत ...नला जाणे भाग पडल्याने त्यांनी जुलै १९२० मध्ये तिकडे प्रयाण केले. बाबासाहेबांच्या उच्चशिक्षणाच्या ...साठी महाराजांनी आर्थिक साहाय्य पाठवून दिले. तसेच "रमाबाई ही धाकटी बहीन,तुम्ही लंडनहून परत ...पर्यंत मी तिला माहेरी कोल्हापूरी घेवून जातो " असे अंतरीच्या प्रेमाचे बोलणे केले. या उद्‌गारामुळे ...बासाहेबांच्या मनात महाराजांविषयी किती कमालीचा आदरभाव निर्माण झाला असेल, याची आपण ...पना करू शकतो. या वर बाबासाहेबांनी महाराजांच्या अंतकरणातील जिव्हाळयाबद्दल आभार मानून "मी ...बाची मुंबईस शक्यतो सर्व व्यवस्था करून जात आहे, आपण या बद्दल त्रास घेवू नये " असे ...नम्रपुर्ण उत्तर दिले. या दोन महापुरूषांची मुंबईतील ही शेवटची भेट ठरली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ...रुडला जाण्या वेळी शाहू महाराजांनी इंग्लड मधील आपले स्नेही सर आल्फ्रेड पीज यांना लिहीले पत्र ...बासाहेबांच्या हाती दिले होते. येवू घातलेल्या राजकिय सुधारणा मध्ये हिदुस्थानातील ब्राम्हणेतर ...ाजाच्या न्याय हक्कांची इंग्रज राज्यकर्त्यांनी उपेक्षा केली असून त्याबाबत इंग्लड मधील लोकमत जागृत ...ण्याच्या कामी बाबासाहेबांना सर पीजनी सहकार्य करावे, अशी विनंती त्या पत्रात केली होती. शाहू ...राजांच्या अपेक्षेप्रमाणे ब्राम्हणेतर चळवळीची बाजू मांडण्यासाठी बाबासाहेब इंग्लडमधील पुढाऱ्यांच्या ...ीभेटी घेत होते तसेच तेथील वृत्तपत्रात लेखन करीत होते. तसेच भारतमंत्री मॉटेग्यूसाहेबांचीही त्यांनी ... घेतली होती. ३ फेब्रुवारी १९२१ राजी महाराजांना लिहीलेल्या पत्रात बाबासाहेब म्हणतात,"मॉटेग्यू हा ...स्त पुढाऱ्यांच्या सूचने प्रमाणे वागतो. तथापि तो आता ब्राम्हणेत्तर चळवळीसंबंधाने तुच्छतेने बालणार ...ी अशी माझी खात्री झाली आहे "[५]

तसेच इंग्लडमध्ये विद्याभ्यास सांभाळून बाबासाहेब ब्राम्हणेत्तरांच्या हक्का विषयी तेथील लोकमताचे ...धन करणारी चळवळ चालवित होते. तर इकडे हिदुस्थानात शाहू महाराज बाबासाहेबांची प्रतिष्ठा व ...सन्मान वाढविण्याचे कार्य करत होते.

बाबासाहेब इंग्लडला असलेतरी त्याचा शाहू महाराजा विषयी जव्हाळयाचा पत्रव्यवहार चालूच ...ा ४ सप्टेंबर रोजी १९२१ रोजी त्यांनी महाराजांना पाठविलेल्या पत्रात इंग्लडमधील चलनाचे भाव ...रल्यामुळे आपणा पुढे आर्थिक अडचण निर्माण झाली असून ती निवारण्यासाठी २०० पौंडांची रक्कम ...ठवून देण्याची विनंती केली होती. याच पत्राच्या शेवटी बाबासाहेबांनी लिहीले होते,"आपली प्रकृती ठिक ...सावी अशी मला अशा आहे . आपली आम्हाला फारच जरूरी आहे. कारण हिदूस्थानात प्रगती करत ...सलेल्या सामाजिक लोकशाहीच्या महान चळवळीचे आपण एक अधारस्तंभ आहात "

अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जव्हाळयाचे संबंध निर्माण ...लेले होते. असा सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ, अस्पृश्याचा सखा इहलोकाची यात्रा संपवून निघून ...ल्याची वार्ता जेव्हा बाबासाहेबांनी लंडनच्या वृत्तपत्रात वाचली तेव्हा या वार्तेने ते व्याकुळ झाले. ...हाराजांचे थोरले पुत्र,नुतन छत्रपती राजाराम महाराज ,यांना लिहिलेल्या सांत्वपर पत्रात ते म्हणतात,ही ...कटाची घटना मला दोन कारणांमुळे दु:खदायक झाली आहे, त्यांच्या मरणाने मी एका वैयक्तिक मित्राला ...चळवळी आणि अस्पृश्य आपल्या एका महान हितचिंतकाला व सर्वात महान कैवाऱ्याला मुकला आहे.



Scanned with CamScanner

... दुःखाने व्याकुळ झालो असताना आपल्या व विधवा महाराणीसाहेबांच्या दुःखात अपार आणि ...ळीची सहानुभूती व्यक्त करीत आहे.[६]

...प्रमापन :—

राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भेट आणि त्यानंतर घडून आलेला ...परांतील सहयोग ही आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील एक अपुर्व घटना होती असे दिसून येते. ...तातील जातीव्यवस्था ,अस्पृश्यता निष्ट करण्यासाठी चांगल्या नेतृत्वाची उनिव होती तसेच ...स्थानातील कोटयावधी दलीत बांधवांची गान्हाणी सोडविणाऱ्या नेत्याची हिंदूस्थानला गरज होती ती डॉ. ...ासाहेबांच्यारूपाने लाभल्याचे दिसून येते. राजर्षी शाहू महाराजांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना ...वेळी उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य दिलेले दिसून येते.

...र्भ ग्रंथसूची :—
पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, २००७,पृ १००
सा...खे,नानासाहेब,शाहूंच्या आठवणी,वृषाली प्रकाशन,कोल्हापूर,२००८, पृ ८१
पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर २००७,पृ ९९
बागल,माधवराव, राजर्षी छत्रपती शाहू महाराज,यशदा प्रकाशन,मुंबई,१९६९,पृ ७१
पवार जयसिंगराव,राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ,महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, २००७,पृ ९६
...जोशी,तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री,मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई,१९९५,पृ २०१



Scanned with CamScanner